






**बोललेला नवस यशस्वी झाल्यावर सेवा म्हणून रश्मी लुडबे जत्रेत मसाल्याचं दुकान लावतात. पर्यटनासाठी मालवणात आलेल्या एका परदेशी नागरिकाने हौसेने जत्रेला हजेरी लावली. भराडीदेवीच्या या जत्रेत सांगलीहून ज्योतिष सांगायला आलेल्यांची संख्या भरपूर होती. भाविकांच्या भाबडेपणाचा फायदा घेत त्यांनी दिवसाला किमान हजार रुपयांचा गल्ला जमवला. भराडीदेवीला जत्रेत इतर राजकीय पक्षांच्या बॅनरप्रमाणे अरुण गवळीचा शुभेच्छा देणारा बॅनरही दिमाखात झळकत होता. जत्रेच्या काळात देवीच्या खणा–नारळाच्या ओटीचीच उलाढाल काही लाखात झाली.**

अधिक जमिनीवर सांडत असतो. पण त्याची भक्तांनाही फिकीर नसते आणि महाप्रसाद फेकणाऱ्यांनाही. उलट तसं विचारल्यावर उत्तर मिळतं– 'वरच्यावर झेलला गेला तो प्रसाद आणि जमिनीवर पडला तो साधा भात.'

मात्र हा साधा भातही अनेकांच्या तोंडी लागत नाही, ते यांना कोण सांगणार?

पण केवळ महाप्रसादच नाही, तर भराडीदेवीचे वर्षभरात होणारे सगळेच विधी काहीसे गूढ आहेत. आणि त्या विधींना *गावऱ्हाटी* असं संबोधून त्या विधींची माहिती गावकरी इतरांना सांगत नाहीत. उदाहरणार्थ, पूर्णपणे शाकाहारी मानलेल्या या देवीच्या जत्रेची तारीख ठरवताना मात्र तिला मांसाहाराचा नैवेद्य दाखवला जातो. जत्रेची ही तारीख ठरवणं हादेखील आंगणेवाडीवासीयांचा एक मोठा कार्यक्रमच असतो. देवदिवाळीला सर्व ग्रामस्थ भराडीदेवीच्या देवळातच एकत्र जमतात. त्यावेळी चटईवरच बसण्याची प्रथा आहे. महाराष्ट्रातल्याच नव्हे, तर भारतातल्या बहुतेक सर्व जत्रा या विशिष्ट महिन्यातल्या पौर्णिमेला किंवा इतर कुठल्या तरी मुहूर्तावर असतात. पण आंगणेवाडीच्या जत्रेचा दिवस मात्र गावकरीच नक्की करतात. हा दिवस नक्की करताना आधी ते देवीला *कौल* लावतात. देवीने *कौल* दिला, तरच ठरवलेला दिवस नक्की करतात. जत्रेचा हा दिवस ठरवण्याआधी डुकराच्या शिकारीचा खास विधीही असतो. या शिकारीसाठी काही ग्रामस्थ जंगलात जातात. जोपर्यंत डुकराची शिकार मिळत नाही, तोपर्यंत ते घरी परतत नाहीत. मग शिकारीसाठी एक–दोन किंवा दहा दिवस लागले तरी बेहत्तर! ते जंगलातच तळ ठोकतात. शिकार मिळाल्यावर डुक्कर पाठीवर मारून ते विजयोन्मादात गावात प्रवेश करतात. त्यावेळी गावातल्या महिला त्यांना ओवाळतात. ही *शिकार* देवीसमोर दीपमाळेवर ठेवून तिला तिचा नैवेद्य दाखवला जातो आणि मग त्या डुकराचं मटण प्रसाद म्हणून घरोघरी वाटलं जातं.

अशा काही ग्रामीण प्रथांमुळे आधीच भराडीदेवीभोवती एक गूढ वलय निर्माण झालं आहे. त्यात ती *नवसाला पावते,* अशी भक्तांची श्रद्धा असल्यामुळे गेल्या काही वर्षांत या जत्रेची लोकप्रियता वाढलेली आहे.

कोकणात जत्रा मोठ्या प्रमाणावर होतात. त्या जत्रा एकप्रकारे गावजत्राच असतात. त्यामुळे त्या जत्रांमध्ये फार मोठी आर्थिक उलाढाल होत नाही. पण आंगणेवाडीच्या जत्रेने कोकणातल्या जत्रांचे सर्वच उच्चांक मोडीत काढले आहेत. या जत्रेत लागलेल्या दुकानांचीच संख्या तब्बल ५००हून अधिक होती. काही दुकानं, तर पार खानदेश–सोलापूरहून आलेली होती. त्यात सोलापुरी चादरींपासून पंढरपुरातून आलेल्या हॉटेल व्यावसायिकांचाही सहभाग होता. या सर्व दुकानांत दोन दिवसात झालेली खरेदी–विक्री आणि मंदिरात भाविकांनी उदारहस्ते दिलेली देणगी हा सारा आकडा किमान सात ते दहा कोटी रुपयांच्या घरात असल्याचा अंदाज गावातील काही जाणकार व्यक्त करतात.

लोकप्रियतेमुळेच आज भराडीदेवीच्या देवस्थानाला ऊर्जितावस्था आली आहे. मूळ कौलारू मंदिराच्या जागी राजस्थानी स्थापत्यशैलीतील सुरेख मंदिर उभं राहिलं आहे. तसंच मंदिरावर साडेतीन किलो सोन्याचा कळसही चढला आहे. या ऊर्जितावस्थेला नारायण राणेंचा मोठा हातभार लागल्याचं आंगणेवाडीवासीय खुल्या दिलाने मान्य करतात. कारण स्थानिक प्रशासनाच्या माध्यमातून आंगणेवाडीला रस्ता–वीज–पाणी यासारख्या अनेक सुविधा नारायण राणेंनी उपलब्ध करून दिल्या. अगदी यावर्षीही आंगणेवाडीच्या विकासासाठी त्यांनी मोठा निधी उपलब्ध करून दिला. देवस्थानला भाविकांच्या देणग्यांच्या माध्यमांतून मोठा निधी उपलब्ध होत असतानाही जिल्हा पंचायतीकडे येणाऱ्या निधीपैकी ५० टक्क्यांहून अधिक रक्कम आंगणेवाडीच्या विकासाकडे वळवण्यात आली.

मात्र जत्रेच्या माध्यमातून देवस्थानचा आणि पर्यायाने गावाचा विकास होत असताना आंगणेवाडीवासीयांनी आता सामाजिक भानही व्यक्त करायला हवं. देवस्थानच्या माध्यमातून मिळणारा पैसा केवळ आपल्याच गावाच्या विकासासाठी खर्च करताना कोकणातील अनेक गावं मूलभूत सोयी–सुविधांपासून वंचित असल्याचं लक्षात घ्यायला हवं. तसं झालं तरच भराडीदेवी केवळ नवस केलेल्यांनाच नाही, तर न करणाऱ्यांनाही पावते, असं लोक म्हणतील.

■ छायाचित्रे: **प्रकाश सरमळकर**